दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com vadalvartanews@gmail.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● मंगळवार ११ जून २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक ३०३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# मराठा आरक्षण आणि मराठा जाती विरोधात बोलू नका अन्यथा काँग्रेसच्या सर्व सीट पाडेन मनोज जरांगे पाटील

## विरोधी पक्ष नेते आणि काँग्रेस नेत विजय वडेट्टीवार यांना इशारा



मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी राज्याचे विरोधी पक्ष नेते आणि काँग्रेस नेत विजय वडेट्टीवार यांनी इशारा दिला आहे. “मराठा आरक्षण आणि मराठा जाती विरोधात बोलू नका, अन्यथा विजय वडेट्टीवारला पाडेन आणि काँग्रेसच्या सर्व सीट पाडेन” असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. जाल्यानाचे खासदार अमर काळे मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी आले होते. त्यावेळी मीडियाच्या बूमसमोर स्टेजवरुनच मनोज जरांगे पाटील यांनी हा इशारा दिला. सगे सोयरे कायद्याची अंमलबजावणी करावी या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा आंदोलन सुरु केलं आहे. मनोज जरांगे पाटील यांचा इशारा काँग्रेसने गांभीर्याने घेण्याची गरज आहे. कारण नुकत्याच जाहीर झालेल्या लोकसभा निवडणूक 2024 च्या निकालात मराठवाड्यात मराठा आरक्षणाचा फॅक्टर चालला होता. त्यामुळे महायुतीच्या उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला. मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी गेलेले काँग्रेसचे अमर काळे यांनी जालन्यातून लोकसभेची निवडणूक जिंकली. त्यांनी भाजपाचे दिग्गज नेते रावसाहेब दानवे यांचा पराभव केला.

### विधानसभा निवडणुकीत जास्त फजिती होईल’

मी एवढा विरोध मराठ्यांसाठी करतोय. आम्हला दुसरं काही अपेक्षित नाही’ असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. भेट घ्यायला आलेल्या कल्याण काळेंसंदर्भात म्हणाले की, “ते कशासाठी आले मला माहित नाही. बसले त्यांनी चर्चा केली. काँग्रेस मराठ्यांची मतं घेते आणि निवडून आल्यावर आमच्याविरोधात वडेट्टीवार बोलतायत. याबद्दल काळे यांच्याकडे नाराजी व्यक्त केली” “उपोषणाच्या काळातच मागण्या पूर्ण करा नंतर नको सरकारला आमचा रोष परवडणारा नाही. आम्हाला मरेपर्यंत आरक्षणाची अपेक्षा सरकारकडून राहील” असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. “सरकार आमच्या मागण्यांबाबत दुटप्पीपणा करत आहे. आता यांची थोडी फजिती झाली. विधानसभा निवडणुकीत जास्त फजिती होईल” असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाबद्दलचे आपले विचार मांडले. “आमची लेकरं मोठी झाली पाहिजेत. यासाठी आम्ही जीवाची बाजी लावतोय. आम्ही दिलेल्या व्याख्येनुसार सगे-सोयरे कायद्याची अंमलबजावणी करावी. आमच्या मागण्या पूर्ण कराव्या यासाठीच आम्ही जीव जाळतोय, पण दिलं नाही तर कुणालाही सोडणार नाही” असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला.

## न्यायालयीन प्रकरणांचा त्वरित लागणार निकाल सर्वोच्च न्यायालयातर्फे विशेष लोकअदालत

**प्रतिनिधी/बीड**

बीड - सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली येथे दिनांक 29 जुलै ते 3 ऑगस्ट 2024 या कालावधीमध्ये विशेष लोक अदालत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकअदालतीमध्ये सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे तडजोडीसाठी ठेवली जाणार आहेत. जिल्हयातील ज्या पक्षकारांची प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असतीलव ती तडजोडीने मिटवावीत अशी ज्यांची इच्छा असेल अशी प्रकरणे विशेष लोकअदालतीमध्ये ठेवता येऊ शकतात. उपरोक्तलोकअदालतीमध्ये पक्षकारप्रत्यक्ष किंवा आभासी पध्दतीने सहभाग घेऊ शकतात. जिल्हयातील प्रकरणे सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष लोकअदालती मध्ये ठेवण्यासाठी संबंधित वकिलांना कल्पना द्यावी किंवा अधिक माहितीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड किंवा संबंधित तालुका विधी सेवा समिती यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव जी.जी.सोनी यांनी केले आहे.

## नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ घेतल्याने नायगावात फटाके,ढोल ताशाच्या गजरात जल्लोष

**प्रतिनिधी/नायगाव**

भारतवासीयांची यशस्वीरित्या दहा वर्ष आपल्या पंतप्रधान पदावरुन सेवा केल्यानंतर तिसऱ्यांदा भारताचे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी हे शपथ घेतल्यामुळे नायगाव येथे भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष दत्ता पाटील ढगे शहराध्यक्ष माधव पाटील कल्याण महिला शहराध्यक्षा सौ पल्लवी बळीराम वडजे यांच्या नेतृत्वाखाली फटाके आणि ढोलताशाच्या गजरात जल्लोष साजरा करण्यात आला.

नायगाव शहरातील शिवाजी चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस युवा नेते रुपेश देशमुख,माजी नगरसेवक देविदास बोंमनाळे ,माजी सभापती बाबासाहेब हंबर्डे, श्रीहरी नरंगलकर, जयश्रीताई



बालाजी नरवाडे सरपंच गजानन पाटील तोडे,सरपंच रंजीत कुरे कोंडीबा पाटील शिंदे, भास्कर पाटील बेलकर, शिवाजी पाटील शिंदे, गंगाधर पाटील कल्याण, प्रताप पाटील बोंमनाळे, राजेंद्र सोनकांबळे यांनी पुष्पहार घालून अभिवादन केल्यानंतर घोषणाबाजी करीत शिवाजी चौक ते हेडगेवार चौक पर्यंत रॅलीकडून या मुख्य चौकात रस्त्यावर फटाक्याची आतिषबाजी करीत ढोलताशाच्या गजरामध्ये आमदार राजेश पवार यांच्या समर्थकांनी जल्लोष साजरा केला यावेळी गजानन चव्हाण, शिवानंद जाधव, बालाजी पांचाळ, बळवंत शिंदे, भगवान होनशेटे, हनुमंत शिंदे, विश्वंभर होनशेट्टे, भगवान कोठाळकर, सुधाकर डोंगरगावकर,किशन कानोले,विलास जाधव, शिवराज जाधव, प्रल्हाद बैस, गंगाधर सावरखेडकर, गोविंदराव उपासे, मारुती नारे, मधुकर डोंगरे, व्यंकट लंगोटे, आनंदराव शिंदे, साहेबराव बोंडले, राहुल शिंदे, गोविंद जाधव, धनंजय जाधव, साईनाथ नरवाडे, अविनाश गारोळे, जुनेद पठाण, राजू आप्पा बेळगे, ओमकार पांचाळ, सुभाष पांचाळ, बालाजी सालेगाये, गोविंद आणेराये संजय आणेराये यांची उपस्थिती होती.

## कामगार नेते स्व. शाम म्हात्रे यांची पुण्यतिथि दिमाखात साजरी.

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**

दिवंगत जेष्ठ नेते शाम पदाजी म्हात्रे यांचे सहावे पुण्यस्मरण ९ जून २०२४ रोजी खांदा कॉलनी येथील त्यांच्या निवास्थानी त्यांच्या कन्या कामगार नेत्या कु . श्रुती शाम म्हात्रे यांनी अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित केला होता.

स्व.शाम म्हात्रे यांच्या पुण्यतिथी निमित्त सकाळी आगरी शिक्षण संस्था शाळेत अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमास कामगार नेत्या कू.श्रुती शाम म्हात्रे यांच्या हस्ते स्व. शाम म्हात्रे साहेब यांच्या प्रतिमेला पुष्हार अर्पण करण्यात आला.त्यावेळी आगरी शिक्षण संस्थेचे मुख्याध्यापक पंकज भगत तसेच शिक्षक वृंद उपस्थित होते. त्यानंतर त्यांच्या राहत्या घरी अभिवादनाच्या कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी हजेरी लावत स्व.शाम म्हात्रे यांच्या आठवणींना उजाळा दिला.



स्व.शाम म्हात्रे यांच्या पुण्यतिथी निमित्त सामाजिक बांधिलकितून त्यांची कन्या श्रुती म्हात्रे दरवर्षी विविध उपक्रम राबवित असतात ह्या वर्षी त्यांनी स्वामी समर्थ फाउंडेशन या संस्थेला सामाजिक बांधिलकी जाणिवेतून सढळ हस्ते रोख निधी स्वरूपात भेट देऊन आपल्या वडिलांच्या आठवणींना तेवत ठेवण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे .त्यानंतर संध्याकाळी गणेश मंदीर तसेच व्यावसायीक विक्रेता संघ येथिल व्यापारी वर्गाने देखील अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित केला होता.संध्याकाळी गणेश मंदिरात श्रुती म्हात्रे ह्यांच्या हस्ते गणेशाची आरती करून त्यानंतर पुण्यतिथी साजरी करण्यात आली .

दिवंगत जेष्ठ नेते शाम म्हात्रे साहेब यांच्या पुणयतिथीनिमित्त विविध पक्षातील नेतेमंडळी , कार्यकर्ते, कोकण श्रमिक संघातील सर्व कामगार वर्ग तसेच रोज बाजारातील व्यापारी वर्ग आणि आगरी शिक्षण संस्थेतील समस्त परिवार हे या ठिकाणी आदरांजली वाहण्यासाठी उपस्थित राहिले होते.

## जलसमृद्ध गाव अभियानात यंत्रणांनी काम करा-- आढावा बैठकीत तहसीलदार मनीषा मेने यांच्या सूचना

टँकर मुक्त गाव जलसमृद्ध अभियानात यंत्रणांनी मंगळवार (ता.११) पासून तातडीने सर्वेक्षणात निवड केलेल्या दहा गावात काम सुरू करा अशा सूचना सोमवारी तहसीलदार मनिषा मेने यांनी आढावा बैठकीत दिल्या आहे सोमवारी सोयगाव तहसील कार्यालयात सायंकाळी चार वाजता तातडीची बैठक घेण्यात आली या बैठकीत ३३ गावांपैकी सर्वेक्षणात निवड केलेल्या दहा गावात जलसमृद्ध गाव अभियान अंतर्गत काम सुरू करून सर्वेक्षण केलेल्या एकूण ३३ गावांपैकी यावर्षी विहीर अधिग्रहण केलेले दहा गाव प्रत्यक्ष विहीर पुनर्भरण व बोर पुनर्भरण कामासाठी निवडण्यात आले आहेत या दहा गावात मंगळवारी (ता.११)पासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याच्या सूचना देण्यात आल्या. ,यावेळी नायब तहसीलदार गोरखनाथ सुरे, तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया, गटविकास अधिकारी तात्याराव माळी, ग्रामसेवक, तलाठी,कृषी सहायक, जलसंधारण विभागाचे कर्मचाऱ्यांची बैठकेला उपस्थित होते...



## नवीन कायगाव व गंगापूर फाटा(भेंडाळा फाटा) येथे लांब पल्याच्या बसचा अधिकृत बस थांबा मंजूर करा:आमदार सतीश चव्हाण

**गंगापूर/प्रतिनिधी**

गंगापूर तालुक्यातील नवीन कायगाव व गंगापूर फाटा (भेंडाळा फाटा) येथे लांब पल्ला व मध्यम पल्ल्याच्या बसला अधिकृत बस थांबा मंजूर करावा व त्या ठिकाणी नियोजित वाहतूक नियंत्रकाची नेमणूक करावी.अशी मागणी आमदार सतीश चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक यांच्याकडे केली आहे. आमदार सतीश चव्हाण यांनी विभाग नियंत्रक यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, छत्रपती संभाजीनगर ते पुणे महामार्गावरील गंगापूर तालुक्यातील, गंगापूर शहर, नवीन कायगाव,लखमापूर, गणेशवाडी, गळनिंब, भिवधानोरा, अंमळनेर, अगरवाडगाव, धनगरपट्टी, पखोरा, भेंडाळा या गावांसह जामगाव, ममदापूर, नवाबपूर, बगडी परिसरातील नागरिकांना नेवासा, पुणे, अहमदनगर, श्रीरामपूर येथे कामानिमित्त नेहमीच



ये जा करावी लागते. विशेष म्हणजे श्रीरामपूर, नगर, शिर्डी या बसफेऱ्यांवर या १२ ते १५ गावांतील प्रवाशी अवलंबून आहेत. अहमदनगर व श्रीरामपूरकडून येणाऱ्या बस प्रवरासंगम येथे थांबतात मात्र गोदावरी नदीच्या अलीकडील एकही थांबा घेत नाहीत. परिणामी वरील गावातील नागरिकांना प्रवरासंगम किंवा नेवासा फाटा येथे बसमधून उतरून खासगी वाहनाने पुढील प्रवास करावा लागतो. यामुळे प्रवाशांना आर्थिक भुर्दंडाबरोबरच वेळ व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.प्रवाशांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी नवीन कायगाव व गंगापूर फाटा (भेंडाळा फाटा) येथे अधिकृत बस थांबे मंजूर करून बसमधील वाहकांच्या तिकीट मशीनमध्ये नवीन कायगाव व गंगापूर फाटा ही स्थानके समाविष्ट करावी अशी मागणी आमदार सतीश चव्हाण



यांनी केली आहे.

## कविता

# प्रितधारा

नार उभी बांधावर,
उडे जरीचा पदर।
शिरजोरी करे वारा
झाड झेलते अधर।।

चेकाळल काळ नभ
खाली उतरे जलद ।
ओल्या मिठीत सावळी
हळू घाली प्रितसाद ।।

झाली कावरीबावरी
उभी लाजून रानात।
पाहे त्वेषाने मुजोर
वारा लपून पानात।।

झेलतीया ओंजळीत
अलगद प्रीतधारा।
अंगी चेतला वणवा
फुले मनात पिसारा।।

आली प्रणयाला जाग
मनी आभाळाच्या राग।
सांडवून सार पाणी
पळे भूवनीच्या मागं।।

विद्या दौलत सरपाते
गुंजखेड. ता.लोणार
जि.बुलढाणा
9309743246

# ज्ञानराधाच्या सुरेश कुटेसह पत्नी अर्चनाविरुद्धही गुन्हा दाखलज्ञानराधाच्या ठेवीदारांना ३ कोटी ६९ लाखांना फसविले

**दैनिक वादळ वार्ता**
**छ .संभाजीनगर/चैताली औटे**

बीड येथील ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडच्या चेअरमन सुरेश कुटेसह पत्नी अर्चना कुटे व संचालक मंडळ आणि दोन शाखा व्यवस्थापकांनी पैठण येथील शाखेतील ३२ ठेवीदारांची ३ कोटी ६९ लाख ८० हजार ५९८ रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी रविवारी दुपारी ३ वाजता पैठण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंदर्भात पैठण शहरातील मुकेश श्रीचंद पंजवाणी यांच्यासह ३२ ठेवीदारांनी दिलेल्या तक्रार अर्जात म्हटले आहे की, बीड येथील ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेडच्या





पैठण येथील शाखेतून ठेवीवर अधिकचे व्याज देण्याचे आमिष दाखविण्यात आले. त्यामुळे पंचवाणी यांच्या परिवारातील सदस्यांनी या सोसायटीत ४२ लाख ८७ हजार २८५ रुपयांच्या ठेवी ठेवल्या. निश्चित कालावधी होऊनही सदरील रक्कम जाहीर केलेल्या व्याजासह मिळाली नाही, तसेच पंजवाणी यांच्यासह ३२ ठेवीदारांचीही याच अनुषंगाने ३ कोटी ६९ लाख ८० हजार ५९८ रुपयांची फसवणूक झाली. मागील वर्षभरापासून या शाखेला कुलूप आहे. अनेक वेळा चकरा मारूनही रक्कम मिळाली नाही, म्हणून फसवणूक झाली, असे फिर्यादीत नमूद केले आहे. त्यावरून सोसायटीचे संस्थापक चेअरमन सुरेश ज्ञानोबा कुटे, बिझनेस प्रमोटर अर्चना कुटे, ज्ञानराधाचे इतर संचालक, शाखा व्यवस्थापक पवळ, वैजनाथ डाके यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती पोलिस निरीक्षक संजय देशमुख यांनी दिली. सुरेश कुटे है सध्या बीड पोलिसांच्या ताब्यात आहेत लवकरच पैठण पोलिसही त्यांचा या गुन्ह्यात ताबा घेणार असल्याचे देशमुख म्हणाले. ----ठेवीदारांचे आकडे थक्क करणारे ज्ञानराधा मल्टीस्टेटमध्ये पैठण शहरातील नामवंत व्यापारी, व्यावसायिक, उद्योजक, राजकीय मंडळी, शासकीय कर्मचारी यांचे पैसे गुंतलेले आहेत. ठेवीदारांनी डिपॉझिट केलेले आकडे लाखाच्या पुढेच असून, १० लाखांपर्यंत आकडे आहेत. गुंतवणूक करणारे सर्व सुशिक्षित आहेत. त्यामुळे येथील ठेवीदारांची कोट्यवधी रुपयांची रक्कम अडकून पडली आहे.

# नीट च्या विद्यार्थ्यांचे क्रांती चौकात निदर्शने; न्याय देण्याची मागणी

**दैनिक वादळ वार्ता**
**छ.संभाजीनगर/चैताली औटे**

वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता घेण्यात आलेल्या नीट परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या निकालात मात्र भरमसाठ विद्यार्थ्यांना ७२० पैकी ७२० गुण मिळाले आहे. हे विद्यार्थी एक नव्हे तर भरमसाठ आहेत .त्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणात गुण मिळालेच कसे? असा प्रश्न उपस्थित केला जात असून परीक्षेत मोठ्या प्रमाणात घोटाळा झाल्याची शंका व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर आज सकाळी शहरातील साकार पीसीएमबी क्लासेसच्या वतीने क्रांती चौक येथे मूक मोर्चा काढून निषेध केला. यावेळी घोटाळ्याची चौकशी करून कारवाई व्हावी .विद्यार्थ्यांनी यावेळी हातात पोस्टर घेऊन भविष्य वाचवा, आम्हाला न्याय हवा ,अशी मागणी ही करण्यात आली . नुकत्याच झालेल्या नीट परीक्षेचा निकाल असंख्य 720 पैकी 720 असे पैकीच्या पैकी गुण भरमसाठ विद्यार्थ्यांना मिळाले. हे गुण अनपेक्षित आहेत ते कसे मिळाले




याची चौकशी व्हायलाच पाहिजे अशी मागणी यावेळी करण्यात आली .तसेच आज सकाळी झालेल्या मूक मोर्चात नीट परीक्षेत घोटाळा झाला असून त्याची चौकशी व्हायलाच पाहिजे अशी ही मागणी केली. याशिवाय प्रकरणाची चौकशी करून ज्या केंद्रावर परीक्षा घेतली गेली त्या केंद्राची देखील चौकशी व्हावी अशी ही मागणी यावेळी साकार पीसीएमबी क्लासेसच्या वतीने करण्यात आली .तसेच मूक मोर्चातून यावेळी नीट परीक्षा घोटाळा प्रकरणाचा निषेध यावेळी केला. अशा प्रकरणामुळे मेहनती विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होऊ शकते ,याचाही विचार व्हायला हवा इतर विद्यार्थ्यांचे यामुळे भविष्य धोक्यात सापडले आहे ते वाचवा अशी ही मागणी यावेळी केली .तसेच सर्व पैकीच्या पैकी मिळालेल्या विद्यार्थ्यांची रिचेकिंग करण्यात यावी अशी ही मागणी यावेळी केली .यावेळी मूक मोर्चात मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी हातात पोस्टर घेऊन सहभाग नोंदवून नीट घोटाळा प्रकरणाचा निषेध केला. यावेळी क्लासेसचे संचालक अभिजीत पेशकर, यशवंत चव्हाण, विजय थोरात, प्रवीण महाजन, तसेच जगदीश काळे, जयेश जहागीरदार सह आदी अधिकारी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून निषेध केला. यावेळी विद्यार्थ्यांचे भविष्य वाचवा ,चोरी हो गयी मेरी सीट, घोटाळे करणे थांबवा, जस्टीज फॉर नीट, डॉक्टर बनवा गुन्हेगार नाही, आम्हालाही न्याय हवा, माझे भविष्य वाचवा असे पोस्टर हातात घेऊन विद्यार्थ्यांनी मूक मोर्चात सहभाग नोंदवला.

# राज्यातील पाऊस, खते, बी-बियाणे, टँकर, पीक कर्ज, पाणीसाठ्याचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्व विभागीय आयुक्तांकडून घेतला आढावा

**प्रतिनिधी/मुंबई**

मुंबई, दि. १० : हवामान विभागाच्या अंदाजानुसार राज्यात समाधानकारक पाऊस अपेक्षित आहे. पावसाच्या आगमनानंतर शेतकरी खरीप पिकांच्या पेरणीच्या तयारीला लागला आहे. त्यामुळे खते-बियाण्यांच्या अभावी कुठेही पेरण्यांना विलंब होता कामा नये. त्यासाठी शेतकऱ्यांना आवश्यक प्रमाणात बियाणे, खतांचा पुरवठा करावा. प्रत्येक पात्र शेतकऱ्याला पीक कर्ज मिळण्याची दक्षता घ्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्व विभागीय आयुक्तांना दिले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या मंत्रालयीन दालनात आज राज्यातील पाऊसमान, खते, बी-बियाणे पुरवठा, पीक कर्ज वितरण, टँकरची स्थिती, धरणांतील पाणीसाठा व विसर्गाचे नियोजन, पूर नियंत्रण, चारा उपलब्धता याबाबत दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून आढावा घेतला. बैठकीला महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजेश कुमार, आपत्ती व्यवस्थापनचे संचालक लहूराज माळी, कृषी विभागाचे उपसचिव श्री. चांदवले आदी उपस्थित होते. पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, अमरावती विभागीय आयुक्त निधी पांडे, नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी प्रसन्ना-बिदरी, छत्रपती संभाजीनगर विभागाचे उपायुक्त जगदीश मणियार, नाशिक विभागाच्या उपायुक्त राणी ताटे, कोकण विभागाचे उपायुक्त संजीव पलांडे, कृषी आयुक्त रावसाहेब भागडे यांनी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे आपल्या विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती दिली.



उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, पहिल्याच पावसात पुणे शहरातील विविध भागात पाणी साचल्याचे दिसून आले. महापालिकेने याबाबत त्वरित आवश्यक उपाययोजना कराव्यात. मोठ्या पावसात पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी आवश्यक नियोजन करण्यात यावे. राज्यात काही भागात १०० मिलिमीटर किंवा त्यापेक्षा जास्त पाऊस पडला आहे. अशा परिस्थितीत वापसा आल्यानंतरच पेरण्यांचे नियोजन करावे. तसेच पुरेसा पाऊस पडला नसलेल्या ठिकाणी चांगला पाऊस पडल्यानंतरच शेतकऱ्यांनी पेरणी करावी, यासाठी कृषी विभागाच्या समन्वयाने जनजागृती करावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले. हवामान विभागाच्या अंदाजानुसार पाऊस सरासरीपेक्षा जास्त पडणार असल्यामुळे धरणांमधील पाणी सोडण्याचे काटेकोर नियोजन करावे. आंतरराज्यीय धरणांवर जलसंपदा विभागाने आपला समन्वय अधिकारी नियुक्त करावा, त्याच्या माध्यमातून योग्य वेळी पाण्याच्या विसर्गाबाबत नियोजन करावे. पाण्याचा फुगवटा निर्माण होऊन शहरे, गावांत पाणी येणार नाही याची काळजी घ्यावी. आलमट्टी धरणाच्या पाण्यामुळे कोल्हापूर शहरात पुराची समस्या येऊ नये, यासाठी आतापासून नियोजन करावे. तसेच मेडिगट्टा, गोसीखुर्द धरणाबाबतही सतर्क राहून गडचिरोली जिल्ह्यात पूरस्थिती निर्माण होणार नाही, याबाबत काळजी घ्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

पाऊसमान चांगले असल्यामुळे पाणी तुंबणे, अनियंत्रित विसर्गामुळे पूर येणे आदींबाबत यंत्रणांनी काळजी घ्यावी. पूरस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पूर्वसूचना देऊन सतर्क करावे. अशा परिस्थितीत नागरिकांना दिलासा देण्याचा, वेळेवर मदत व पुनर्वसनाचे सर्व उपाय योजण्याचा प्रयत्न करावा. जलसंपदा विभागाने धरणांमधील पाणी सोडण्याबाबत योग्य ते नियोजन करावे. याबाबत अन्य यंत्रणांशी समन्वय ठेवावा. शेतकऱ्यांना पीक कर्ज वेळेवर उपलब्ध होईल याबाबत बँकांना सूचना द्याव्यात, असे निर्देशही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी दिले.

विभागीय आयुक्तांनी आपआपल्या विभागातील पाऊस, धरणातील जलसाठा, खरीप हंगामाचे नियोजन, तर पुणे विभागीय आयुक्त श्री. पुलकुंडवार यांनी यासोबतच आषाढी वारीच्या नियोजनाबाबत माहिती दिली. आषाढी वारिसाठी मंजूर निधी ताबडतोब वितरित करण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी यावेळी दिले.

# माजलगाव तालुक्यात पावसाने हजेरी लावल्यामुळे बळीराजा सुखावला

## सलग दुसऱ्या दिवशी झालेल्या पावसामुळे पेरणिस वेग

**माजलगाव/ प्रतिनिधी**
**परमेश्वर सोळंके**

तालुक्यातील पात्रुड सादोळा या ठिकाणी दुसऱ्या दिवशीही संध्याकाळच्या वेळी झालेल्या पावसामुळे बळीराजा सुखावला असून पात्रुड व सादोळा पंचक्रोशीतील शेत शिवारात पेरणीच्या कामाची लगबग जोरात चालू आहे.



मार्च एप्रिल अखेर पासून बळीराजा हा शेतीच्या मशागतीमध्ये मशगुल झाला होता शेतीची मशागत करून शेत पेरणी योग्य करण्यासाठी फार उन्हात पेरणी पूर्व कामे शेतकऱ्यांनी आवरून घेतली होती आणि जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून तो पावसाच्या प्रतीक्षेत होता. अखेर तो दिवस उजाडला आणि मागील दोन दिवसापासून झालेल्या पावसामुळे बळीराजा सुखावल्याचे चित्र पात्रुड व सादोळा पंचक्रोशीतील शेत शिवारात पहावयास मिळत असून शेतकरी राजा हा पेरणीच्या लगबगीत दिसून येत आहे. पात्रुड शिवारातील शेतीमध्ये पेरणी करण्यास वेग आला असून बळीराजाची लगबग चालू आहे.

## जलसमृद्ध गाव अभियानात यंत्रणांनी काम करा-- आढावा बैठकीत तहसीलदार मनीषा मेने यांच्या सूचना

**छ.संभाजीनगर/ प्रतिनिधी** टँकर मुक्त गाव जलसमृद्ध अभियानात यंत्रणांनी मंगळवार (ता.११) पासून तातडीने सर्वेक्षणात निवड केलेल्या दहा गावात काम सुरू करा अशा



सूचना सोमवारी तहसीलदार मनिषा मेने यांनी आढावा बैठकीत दिल्या आहे सोमवारी सोयगाव तहसील कार्यालयात सायंकाळी चार वाजता तातडीची बैठक घेण्यात आली या बैठकीत ३३ गावांपैकी सर्वेक्षणात निवड केलेल्या दहा गावात जलसमृद्ध गाव अभियान अंतर्गत काम सुरू करून सर्वेक्षण केलेल्या एकूण ३३ गावांपैकी यावर्षी विहीर अधिग्रहण केलेले दहा गाव प्रत्यक्ष विहीर पुनर्भरण व बोर पुनर्भरण कामासाठी निवडण्यात आले आहेत या दहा गावात मंगळवारी (ता.११)पासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याच्या सूचना देण्यात आल्या. ,यावेळी नायब तहसीलदार गोरखनाथ सुरे, तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया, गटविकास अधिकारी तात्याराव माळी, ग्रामसेवक, तलाठी,कृषी सहायक, जलसंधारण विभागाचे कर्मचाऱ्यांची बैठकेला उपस्थित होते...

# सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या वर केज पोलीस ठाण्यात सहा गुन्हे दाखल

**वादळवार्ता/केज**

सोशल मीडियावर जातीय तेढ व सामाजिक तणाव निर्माण करणाऱ्या पोस्ट करणाऱ्यावर केज पोलिसांनी करडी नजर ठेवली असून अशा पोष्ट व्हायरल करणाऱ्या विरुद्ध आतापर्यंत सहा गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दरम्यान यातील एका आरोपीला पुणे येथून अटक करण्यात आली असून एका आरोपीला पाच दिवसाची पोलिस कोठडी ठोठावली आहे. कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्या असामाजिक घटका बाबत केज पोलिसांनी कठोर पावले उचलली आहेत. आता पर्यंत केज पोलीस ठाण्यात एकूण सहा गुन्हे दाखल झाले आहेत तर एका आरोपीला पोलीस पथकाने पुण्यातून ताब्यात घेतले असून त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. केज तालुक्यातील बेलगाव येथील अविनाश दातार बाने भाजपाच्या नेत्या पंकजाताई मुंडे यांच्या बाबत एका गाण्यावर आक्षेपार्ह शब्द वापरून हावभाव बदनामीकारक व दोन समाजात तेढ निर्माण करणारा व्हिडिओ इंस्टाग्रामवर प्रसारित केला होता. त्याची पोलिसांना माहिती मिळताच त्याच्या विरूद्ध केज पोलीस ठाण्यात गु.र.न.३१०/२०२४ भा दं वि.५०५ (२), ५०९, १५३ (अ) बासह माहिती व तंत्रज्ञान कायदा कलम ६६ आणि ६७ नुसार गुन्हा दाखल करण्यात होता. दरम्यान गुन्हा दाखल होताच केज पोलिसांनी पोलीस निरीक्षक प्रशांत



महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक वैभव सारंग व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुणे येथे तळ ठोकून आरोपीला ताब्यात घेतले दरम्यान पुण्यातून ताब्यात घेतलेल्या आरोपीने इंस्टाग्रावर आक्षेपार्ह व्हिडिओ बनवून टाकला होता. आक्षेपार्ह व्हिडिओ बनवून टाकणारा आरोपी अविनाश दातार हा केज तालुक्यातील बेलगाव येथील रहिवासी असून तो सध्या पुणे येथे वास्तव्यास आहे. त्याला पुणे येथुन पोलीस उपनिरीक्षक वैभव सारंग व महादेव बहिरवाळ व मुंडे यांनी ताब्यात घेतले. पोलीस उप निरिक्षक वैभव सारंग व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुणे येथे तळ ठोकून सदर आरोपीला ताब्यात घेतले. त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. तर दुसऱ्या एका गुन्ह्यात केज तालुक्यातील लाडेगाव येथील अमोल रघुनाथ शेप यांने सोशल मीडियावर एखादी न घडलेली घटना ती घडली आहे अशी सोशल मीडियावर अफवा पसरवून सोशल मीडियावर पोस्ट व्हायरल केल्याबद्दल त्याच्या विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गु.र.न. ३१५/२०२४ मा दं.वि.५०५ (२), १५३(अ) या सहमाहिती व तंत्रज्ञान कायदा कलम ६६आणि ६७नुसार गुन्हा दाखल करण्यात होता दरम्यान गुन्हा दाखल होताच केज पोलिसांनी पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली अमोल शेप याला ताब्यात घेतले मात्र पोलिसांना गुंगारा देऊन पोलिस ठाण्यातून पळून गेला. मात्र अवघ्या काही तासातच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. पोलिसांना गुंगारा देवून पळून जाणारा आरोपी घेतला ताब्यात घेऊन पोलिसांनी तत्परता दाखवली सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट व्हायरल करणारा आरोपी अमोल शेप याला चौकशीसाठी पोलीस ठाण्यात बोलविले असताना त्याने पोलिसांना गुंगारा देवून पळून जाण्याचा प्रयत्न केला होता परंतु पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.

### एका आरोपीला पुणे येथून केली अटकसोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट करणाऱ्यावर कठोर कारवाही करणार: पो.नि. प्रशांत महाजन

सोशल मीडियावर कुठल्याही प्रकारच्या वादग्रस्त अथवा दोन समाजात तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट करणाऱ्यावर कठोर कारवाई करण्यात येत असून यापुढे अशा प्रकारच्या वादग्रस्त पोष्ट सोशल मीडियावर करणाऱ्यावर कठोर कारवाही करण्याचा इशारा केजचे पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांनी दिला आहे. केज तालुक्यात मागील काही दिवसापूर्वी सोशल मीडियाच्या माध्यमातून दोन समाजात तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट व्हायरल झाल्यामुळे नांदूरघाट येथे तणाव निर्माण झाला होता. तर एका गावात विशिष्ट समाजाच्या दुकाने आणि हटिल्सवर बहिष्कार टाकण्याची पोस्ट व्हायरल झाल्याने तालुक्यात तणाव निर्माण झाला होता. हा प्रकार शांत होतो ना होतो तोच पुन्हा एकदा अशा पोस्ट व्हायरल होत असल्यानेच केज पोलीस सतर्क झाले आहेत. केज पोलिसांनी आतापर्यंत सोशल मीडियावर वादग्रस्त पोष्ट करणाऱ्यावर सहा गुन्हे दाखल केले आहेत.

## छगन भुजबळांच्या भाषणाने षणमुखानंदची सभा गाजवली

राष्ट्रवादी काँग्रेसचा आज 25 वा वर्धापनदिन साजरा होत आहे. यंदा पहिल्यांदाच दोन वर्धापनदिन साजरे होत आहेत. राष्ट्रवादीच्या शरद



पवार गटाचा अहमदनगरमध्ये वर्धापनदिन साजरा होत आहे. तर राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचा मुंबईत वर्धापनदिन होत आहे. मुंबईतील षणमुखानंद सभागृहात राष्ट्रवादीची स्थापना झाली होती. त्याच सभागृहात अजित पवार गट वर्धापन दिन साजरा करत आहे. यावेळी पक्षातील विविध नेते आपलं मनोगत मांडत आहेत. राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी या सभेला संबोधित केलं. तेव्हा त्यांनी विविध मुद्द्यांना स्पर्श केला. लोकसभा निवडणुकीत ठेच लागल्याची खंत त्यांनी बोलून दाखवली.

## माजी तहसीलदार श्री पांडुरंग नामदेव वाघ यांचा ७५ वा वाढदिवस साजीरी

**सोलापूर/प्रतिनिधी**

सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी माजी तहसीलदार श्री पांडुरंग नामदेव वाघ यांचा ७५ वा वाढदिवस रविवारी ९ जून२०२४ रोजी श्रीराम मंगल कार्यालय दूध पंढरी शेजारी (इसबावी) पंढरपूर जि. सोलापूर या ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरा झाला. यावेळी श्री पांडुरंग नामदेव वाघ यांनी त्यांच्या पत्नी सौ इंदुमती व सौ सुमती व त्यांच्यासोबत केक कापून आनंद व्यक्त केला. कार्यक्रमाचे नियोजन त्यांची मुले संतोष पांडुरंग वाघ मोहन पांडुरंग वाघ वैभव पांडुरंग वाघ मुली सौ.अनिता शिवानंद गायकवाड सौ. वैशाली दीपक शिनगारे सौ.मनीषा वामन वेताळ तसेच त्यांचे सुनबाई व



जावई यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते. विशेष म्हणजे वाघ साहेब यांनी लग्नानंतर त्यांच्या पत्नीचे शिक्षण पूर्ण करून शासकीय नोकरीत शिक्षक म्हणून त्यांना नोकरीची संधी दिली. मुलांना मुलींना चांगल्या प्रकारचे शिक्षण देऊन त्यांनी दोन मुले शिक्षक दोन मुली शिक्षिका एक मुलगा इंजिनियर केला व त्यांना त्यांच्या स्वतःच्या पायावर उभे केले. कार्यक्रमामध्ये ७५ पणत्या लावून वाढदिवस जल्लोषात साजरा करण्यात आला वाढदिवसामध्ये नातवंडांनी आजोबांच्या वाढदिवसानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम राबवला होता यामध्ये गाणी व आजोबाविषयी मनोगत व्यक्त केले. वाढदिवसाला विविध मान्यवर पदाधिकारी व नातेवाईक मित्रपरिवार मोठ्या प्रमाणात शुभेच्छा देण्यासाठीआले होते. तसेच वाघ प्रेमी यांनी उपस्थित रहात पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या अभिष्टचिंतन सोहळा निमित्त स्नेह भोजनाचा आस्वाद उपस्थितांनी घेतला. आजोबांना निरोगी दीर्घायुष्य लाभो हीच वाढदिवसानिमित्त सदिच्छा

# स्वाराती रुग्णालयातील कालबाह्य झालेली सीटी स्कॅन मशीन तात्पुरत्या अवस्थेत पुन्हा सुरु . आ. नमिता मुंदडांचे प्रयत्न यशस्वी; नवीन मशीनसाठी प्रयत्न सुरु

**प्रतिनिधी/अंबाजोगाई**

अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयातील सीटी मशीन मागील सात महिन्यापासून बंद पडली होती. आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्यानंतर अनेक अडचणींवर मात करत हि मशीन तात्पुरत्या अवस्थेत पुन्हा सुरु करण्यात यश मिळाले आहे. त्यामुळे अति अत्यावस्थ रुग्णांची गैरसोय टळणार आहे दरम्यान, कालबाह्य झालेली सध्याची मशीन कितपत चालेल याबाबत शंका असल्याने आ. नमिता मुंदडा यांनी नवीन सीटी स्कॅन मशीनसाठी युद्धपातळीवर पाठपुरावा सुरु केला आहे. अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयाचा अंबाजोगाई, बीडसह आजूबाजूच्या जिल्ह्यातील गोरगरीब रुग्णांना मोठा आधार आहे. रुग्णांच्या सोयीसाठी अत्यल्प दरात अद्यावत यंत्रसामुग्रीद्वारे तपासणी करून उपचार होत असल्याने येथे रुग्णांची दररोज प्रचंड गर्दी असते. मात्र, मागील सात महिन्यापासून येथील सीटी स्कॅन मशीन बंद पडल्याने रुग्णांची गैरसोय होऊ लागली होत. सर्व सीटी स्कॅन मशीनचे आयुष्य १० वर्षांचे असते, मात्र स्वाराती रुग्णालयातील मशीनला १२ वर्षे झालेली आहेत. त्यामुळे केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे नवीन मशीनसाठी पाठपुरावा सुरु केला. परंतु, हि प्रक्रिया वेल्काहू असल्याने तोपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात जुनी मशीन देखील सुरु करावी आ. मुंदडा यांनी प्रयत्न सुरु केले. परंतु बिले थकल्याने फिलिप्स कंपनीकडून योग्य प्रतिसाद मिळत नव्हता. अखेर आ. मुंदडा यांनी पुढाकार घेत अधिष्ठाता आणि फिलिप्स कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत स्वतःच्या निवासस्थानी बैठक घेतली. त्यानुसार, फिलिप्स कंपनीचे गतवर्षीचे थकीत ४७ लाख रुपयांचे यावर्षी डिसेंबरपर्यंत टप्प्याटप्प्याने देण्याचे ठरले. तसेच चालू वर्षाचे संपूर्ण लाख रुपयांचे बिल देण्याऐवजी ११ लाख रुपये लेबर चार्जमध्ये मशीन दुरुस्त करून देण्यासाठी आ. मुंदडा यांनी फिलिप्स कंपनीला तयार केले. दरम्यान, रुग्णालयाचे अधिष्ठाता यांनी इतर रुग्णालयाच्या अधिष्ठातांशी संपर्क साधून त्यांच्याकडील कालबाह्य झालेल्या मशीनचे चालू सेकंद हॅण्ड पार्ट देण्यासाठी विनंती केली. सर्व प्रशासकीय प्रक्रिया पार पडल्यानंतर मशीनचे जुने पार्ट उपलब्ध झाले. त्यानंतर फिलिप्स कंपनीच्या तंत्रज्ञांनी स्वाराती मधील मशीनला हे पार्ट जोडून मशीन सुरु करून दिली. त्यामुळे सद्यस्थितीत तरी अति आवश्यक रुग्णांसाठी या मशीनचा वापर करणे शक्य होणार असल्याने रुग्णांना दिलासा मिळाला आहे. नवीन मशीनसाठी प्रयत्नशील 'स्वाराती'मध्ये येणाऱ्या रुग्णांची संख्या पाहता सध्याची मशीन कालबाह्य झाल्याने राज्य शासनाकडे नवीन मशीनची मागणी केली आहे. त्यासाठी सर्व स्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरु असून त्यास लवकरच यश मिळेल. तोपर्यंत तात्पुरत्या अवस्थेत जुनी मशीन सुरु करून घेतली आहे. केवळ अतिगंभीर रुग्णांसाठी मशीनचा उपयोग करणे शक्य आहे. आ. नमिता मुंदडा, केज विधानसभा मतदार संघ

मशीन सुरु झाली, काळजी घेणे आवश्यक कालमर्यादा संपूनही रुग्णांची गरज लक्षात घेता सध्याची मशीन कार्यान्वित करण्यात आली आहे. जुनी असल्याने मशीन लवकर गरम होत आहे. मशीनचा सतत वापर करणे शक्य नसून अधूनमधून खंड देणे गरजेचे आहे. त्यामुळे केवळ अति अत्यावस्थ रुग्णांसाठीच मशीनचा करण्यात येणार आहे. अडचण लक्षात घेता रुग्ण आणि नातेवाईकांनी सहकार्य करावे डॉ. शंकर धपाटे, अधिष्ठाता

## बि-बीयाण्यांच्या वाढत्या किंमतीने शेतकरी हतबल कृषी विभागाचा फक्त देखावा-अँड. अजित देशमुख

**प्रतिनिधी/अंबाजोगाई**

कृषी विभागाकडून बैठका घेऊन बि-बीयाणे आणि खते विक्रीवर नियंत्रण ठेवले जात आहे, हे दाखवण्याचा भास निर्माण केला जात आहे प्रत्यक्षात बेभाव विक्री चालू असून यामुळे उन्हाच्या तीव्रतेने होरपळलेला शेतकरी त्रस्त झाला आहे. त्यामुळे कृषी विभागाने यावर तात्काळ नियंत्रण आणावे. अन्यथा शेतकऱ्यांच्य रोशाला सामोरे जावे लागेल, असा इशारा जन आंदोलनाचे विश्वस्त अँड. अजित एम देशमुख यांनी दिला आहे पाऊस पडला असल्याने शेतकऱ्यांना आता बी बियाणे आणि खतांची तात्काळ गरज आहे. मात्र दुप्पट किमतीने विकले जाणारे बियाणे शेतकऱ्यांनी खरेदी कसे करावे, हा प्रश्न निर्माण झाला आहे. एकीकडे गेल्या काही वर्षांपासून निसर्गाचे संतुलन ढासळलेले असताना शेतकऱ्यांना चढ्या भावाने बियाणे विक्री होत असताना प्रशासन गप्प का ? असाही प्रश्न निर्माण होत आहे प्रत्येक दुकानदाराने आपल्याकडे स्टॉक किती आहे ? कोणते बियाणे कोणत्या दराने विकले जातात ? याचे दर पत्रक आपल्या दुकानात बंधनकारक आहे. गेल्या काही वर्षांपासून हा नियम आमच्या आंदोलनानंतर लागू करण्यात आला होता. मात्र याचाही विसर बऱ्याच ठिकाणी पडलेला दिसतो वास्तविक पाहता कृषी विभागाने जिल्ह्याच्या काना - कोपऱ्यातील प्रत्येक दुकानात जाऊन किती माल शिल्लक आहे ? कोण कोणत्या प्रकारची बियाणे शिल्लक आहेत ? खतांचा तुटवडा का भासवला जातो ? हे पहायला हवे. यामुळे ठोक आणि किरकोळ विक्रीच्या दुकानावर अचानक धाडी टाकून तपासणी केली पाहिजे. पण ते होत नाही. त्यामुळे या खात्यात भ्रष्टाचार माजला असल्याचे वर वर पाहता दिसते शेतकऱ्यांची हित



जोपासण्यासाठी कृषी विभागाने दक्ष रहावे अन्यथा जिल्ह्याच्या कृषी विभागाकडे आणि तेथे चाललेल्या अनागोंदीकडे आम्हाला लक्ष द्यावे लागेल, असेही अँड. देशमुख यांनी म्हटले आहे.




बालासाहेब फपाळ यांचा वाढदिवस साजरा करताना संपादक दिगंबर सोळंके परमेश्वर सोळंके अमर साळवे बाळासाहेब आढागळे विजय डावरे सिद्धेश्वर गायकवाड व संघर्ष लढा ग्रुप माजलगाव

# ढगांचा गडगडाट आणि विजांचा कडकडाट, मुंबई सह राज्यात धुवाँधार पाऊस

महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईत पावसाने एन्ट्री मारली आहे. विजांच्या कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह मुंबईत मुसळधार पाऊस पडत आहे. मुंबईत काही ठिकाणी पावसाच्या सरी पडत आहेत. तर दादर, करी रोड, परळ या भागात धुवाँधार पाऊस पडत आहे. विशेष म्हणजे मुंबईसह आज सोलापूर आणि पुण्याला आजच्या पावसाने चांगलंच झोडपलं आहे. सध्यातरी कोणत्याही ठिकाणी पाणी साचल्याची माहिती समोर आलेली नाही. पण पावसाने दमदार हजेरी लावली आहे. खरंतर मुंबई, ठाणेसह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये ढगाळ वातावरण होतं. काही ठिकाणी दिवसा पाऊसही पडला. मुंबईत संध्याकाळनंतर मान्सून



दाखल झाला. जोरदार पाऊस पडला. पावसासह आलेल्या वाऱ्यामुळे मुंबईकरांना दिलासा मिळाला आहे. मुंबईकरांची उकाड्याने सुटका झाली आहे. मुंबईतील दादर, शिवाजी पार्क परिसरात पहिल्यांदा पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. तसेच मुंबईमध्ये मान्सून दाखल झाल्याने मुंबईकर आनंदात आहेत. मुंबईकर पहिल्या पावसात भिजण्याचा आनंद घेत आहेत. अर्ध्या तासापेक्षा जास्त वेळ शिवाजी पार्क परिसरामध्ये पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. यानंतर मुंबईतील विक्रोळी, घाटकोपर, मुलुंड, भांडूप, पवई परिसरात मुसळधार पाऊस सुरु झाला. सोलापुरात जोरदार पाऊसविशेष म्हणजे सोलापूर शहरासह जिल्ह्यातही आज संध्याकाळी तुफान पाऊस पडत आहे. त्यामुळे अनेक भागांमध्ये पाणी साचलं आहे. दरम्यान, छत्रपती संभाजीनगर शहरासह जिल्ह्यातील काही भागात पावसाने जोरदार हजेरी लावली. या पावसामुळे नागरिकांची उकाड्यापासून मुक्तता झाली असली तरी शेतकरी मात्र अजूनही मोठ्या पावसाच्या प्रतिक्षेत आहेत. पुणे आणि वाशिममध्ये पाऊसपुण्यात सलग दुसऱ्या दिवशी पावसाची जोरदार हजेरी लावली. अर्धा तास जोरदार पावसाच्या हजेरीनंतर रिमझिम पाऊस सुरुच आहे. आजदेखील पाऊस झाल्याने पुणेकरांची तारांबळ उडाली. वाशिमच्या वाशिम, मालेगाव, कारंजा, मंगरूळपिर, शिरपूर मध्ये जोरदार पाऊस पडला.

## सांगलीत चार दिवसांपासून पाऊस

सांगली जिल्ह्यात गेले चार दिवस झाले पाऊस पडत आहे. जिल्ह्यात ठीकठिकाणी नाले तुडुंब भरून वाहत आहेत. तर दुसरीकडे कृष्णा नदीच्या पाणी पातळीतही वाढ झाली आहे. त्यामुळे कृष्णा नदी दुथडी भरून वाहू लागली आहे. कृष्णा नदी पाणी पातळी वाढल्याने सांगलीकर सुखावले आहेत. सांगलीवाडी बंधाऱ्यांवरून पाणी पडू लागले आहे. तर या सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

# दोघा मित्रांनी स्वत: भावपूर्ण श्रद्धांजली चे स्टेटस ठेवले अन नंतर सुपरफास्ट एक्सप्रेस समोर स्वत:ला झोकून दिले.

**प्रतिनिधी नाशिक**

चेहडी पंपिंग गीते मळ्यात असलेल्या म्हसोबा नगरात राहणारे सचिन दिलीप करवर( 17 )संकेत कैलास राठोड (17 )हे दोन्ही बालपणचे मित्र होते, या दोघांची मैत्री सख्या भावासारखी असून ते मित्र नव्हे तर अनेकांना सख्खे भाऊच वाटायचे, अचानक त्यांच्या मनात काय विचार आला कोणास ठाऊक आणि दोघांनी एकदम टोकाचा निर्णय घेतला शनिवार दिनांक



8 सायंकाळी स्वत:च्या वर भावपूर्ण श्रद्धांजली व्हाट्सअप क्रमांकाच्या स्टेटस अशी पोस्ट अपलोड केली. त्यानंतर दोघेही वालदेवी नदी जवळून जाणार्या रेल्वे रुळावर गेले आणि एका सुपरफास्ट एक्सप्रेस रेल्वे पुढे स्वत:ला झोकून देत जीवन प्रवास कायमचा संपविला. त्यामुळे करवर व राठोड कुटुंबीयांवर आभाळ फाटले घटनेची माहिती मसोबा नगर परिसरात वाऱ्यासारखी पसरली आणि संपूर्ण परिसर एकाएकी सुन्न झाला . दोघांच्या घराबाहेर नागरिकांची एकच गर्दी केली होती. दोघांच्या आत्महत्येची नेमकी कारण अद्यापही स्पष्ट होऊ शकलेली नाही . याप्रकरणी नाशिक रोड पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरु केला आहे .रविवारी दुपारी नाशिक रोड येथील देवळाली गाव स्मशानभूमी दोघांवर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले . यावेळी कुटुंबीयांना अश्रू अनावर झाले होते.

## मंगळवेढा आगारात महाराणा प्रतापसिंह यांची जयंती साजरी



**सोलापूर प्रतिनिधी**दिनांक ९ जून २०२४ रोजी राज्य परिवहन मंगळवेढा आगारामध्ये महाराणा प्रतापसिंह यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी स्थानक प्रमुख शरद वाघमारे, वाहतूक नियंत्रक संतोष चव्हाण, दत्तात्रय रायबान, वरिष्ठ लिपिक अमोल काळे, लिपिक प्रकाश नामदे, तसेच वाहक सविता काटकर मॅडम, सोलनकर आदी उपस्थित होते.

# उत्पादन वाढवण्यासाठी बी.बी.एफ.पद्धतीने करा पेरणी : शेती अभ्यासक पल्लवी चिंचवडे यांचा सल्ला

## बीबीएफ पेरणीमुळे अंतरपिकातून देखील उत्पन्न घेता येत

बीबीएफ पद्धतीने पेरणी करताना दोन ओळींमध्ये जागा राहत असल्याने आंतरपिक पध्दतीचा अवलंब करून अधिकचे उत्पन्न घेता येते. ज्या पिकाची पेरणी आपण बिनीएफ पद्धतीने केली आहे त्यामध्ये आंतरपीक घेण्यासाठी जागा असते आणि यामध्ये आपण एकाच वेळी दोन पिकं देखील घेऊ शकतो त्यामुळे एका पिकाचा जर नुकसान झालं तर दुसऱ्या पिकांमधून आपल्याला उत्पन्न घेता येतं..तर बीबीएफ पद्धतीने पेरणी केल्यास नेहमीप्रमाणे पेरणीसाठी होणारा जास्तीचा खर्च टाळता येतो तर बियाणे, खते इ. निविष्ठा खर्चात 20 ते 25% बचत करता येते..



सातत्याने वातावरणात होणारे बदल कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळ यामुळे कृषी क्षेत्रावर मोठा परिणाम होताना पाहायला मिळत आहे. आणि त्यामुळे पेरणी करताना रुंद सरी वरंबा पद्धत वापरुनच पेरणी करावी असा सल्ला शेती अभ्यासक पल्लवी चिंचवडे यांनी दिला आहे. दरवर्षी पडणाऱ्या पावसाचे जास्तीत जास्त पाणी जमिनीत मुरविणे, तसेच पावसाचे जास्तीचे पाणी शेताबाहेर काढून त्याचा सुरक्षितपणे निचरा करणे यासाठी रुंद वरंबा सरी लागवड पद्धत फायदेशीर ठरत असल्याचे अनेक अनुभव शेतकरी सांगत आहेत.. त्यामुळे कधी जास्तीचा पाऊस तर कधी कमी पाऊस झाला तरी उत्पादनामध्ये घट होत नसल्याचं दिसून आलं आहे.. बी.बी.एफ. हे ट्रॅक्टर चलित पेरणी यंत्र आहे यामध्ये रुंद वरंबे व सऱ्या पाडणे, तर पेरणी करताना खते देणे अशी तिन्ही कामे एकाच वेळी केली जातात. यामध्ये दोन फाळ आणि पेरणीचे फण यातील अंतर गरजेनुसार कमी जास्त करता येते. तसेच सऱ्यांची रुंदी देखील कमी जास्त करता येते. त्यामुळे पेरणी केल्यानंतर जास्तीच्या पाण्यामुळे पिकाचे नुकसान होत नाही..बीबीएफ पेरणी यंत्राच्या सहाय्याने जमिनीच्या उतारास आडवी पेरणी केल्यास मुलस्थानी जलसंधारणाचे महत्वाचे काम होत. हि पेरणी पद्धत कोरडवाहू शेतीमध्ये जलसंधारणाच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त आहे. पावसाच्या दिर्घकालीन खंड काळात याचा मोठा फायदा होतो. या पद्धतीमुळे सर्वसाधारणपणे २० ते २७ % जलसंधारण तर २५ % उत्पादनात वाढ दिसून आली आहे. तर या पद्धतीचा वापर केल्यामुळे कोरडवाहू जमिनीमध्ये पाण्याचा निचरा होण्यासाठी मोठी मदत होते.. खत व बियाणे एकाच वेळी पेरल्यामुळे खताचा अधिक कार्यक्षम वापर होतो. कारण पेरणी केल्यानंतर पिकांना उगवणीच्या काळामध्ये ज्या खतांची आवश्यकता असते ती खत मिळत जातात आणि पिकांची उगवण क्षमता देखील वाढते.

# केज पोलीस ठाण्यातून आरोपीचे पलायन

**प्रतिनिधी केज**

सोशल मीडियावर व्हायरल पोष्ट केल्यानंतर पोलिसांनी सदर पोष्ट व्हायरल करणाऱ्या विरुद्ध भादवीच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. आणि आरोपीला चौकशीसाठी ताब्यात घेतले. मात्र पोलिस ठाण्यात आणलेल्या आरोपीने पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पोलीस ठाण्यातून पलायन केल्याची खळबळजनक घटना काल सोम वारी दुपारच्या सुमारास केज मध्ये घडली दरम्यान सोशल मीडियावर न घडलेली घटना घडली आहे असे भासवून दोन समाजात तेढ निर्माण होईल अशी पोष्ट व्हायरल केलेल्या केज तालुक्यातील लाडेवडगाव येथील एका आरोपीला केज पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले. मात्र सदर आरोपीने पोलिसांच्या हातावर तुरी देऊन चक्क पोलीस ठाण्यातून पलायन केल्याची घटना काल सोमवारी दुपारी पावणेबारा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. केज तालुक्यातील लाडेवडगाव येथील अमोल रघुनाथ शेप यांने सोशल मीडियावर एखादी न घडलेली घटना ती घडली आहे. असे भासवून व अशी सोशल मीडियावर अफवा पसरवून सोशल मीडियावर पोस्ट व्हायरल केल्या बद्दल त्याच्या विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गु.र.न.३१५/२०२४ भा दं. वि.५०५ (२), १५३ (अ) या सहमाहिती व तंत्रज्ञान कायदा कलम६६ आणि ६७ नुसार गुन्हा दाखल करण्यात होता. दरम्यान गुन्हा दाखल होताच केज पोलिसांनी पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपी अमोल शेप याला चौकशीसाठी ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणले. मात्र आरोपीने पोलिसांच्या हातावर तुरी देऊन चक्क पोलिस ठाण्यातून पलायन केले. दरम्यान पोलीस कर्मचारी गोरख पांडुरंग फड यांच्या फिर्यादीवरून केज पोलीस ठाण्यात गु.र.न.३१७/ २०२४ कलम २२४ भादवी अन्वये दुसरा गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान चौकशीसाठी ताब्यात घेतलेल्या आरोपीची रखवाली व देखभाल ज्यांचे ताब्यात होती. त्यांना गुंगारा देऊन आरोपींने पलायण केल्याने त्याचे विरुद्ध वरील कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी सदर आरोपींला दुपारनंतर काही वेळानी सदर आरोपीला पुन्हा ताब्यात घेतले आहे.

## मंगळवेढा आगारात महाराणा



## प्रतापसिंह यांची जयंती साजरी

**सोलापूर प्रतिनिधी**दिनांक ९ जून २०२४ रोजी राज्य परिवहन मंगळवेढा आगारामध्ये महाराणा प्रतापसिंह यांची जयंती

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )